# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

तारीख:- ३१/१०/२०१८

## कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि.७३/१०/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत.

---

**मनपा वाहन क्र. एमएच-०४-बी ९३२६ जेसीबी ची दुरुस्ती :-**

**हायड्रोलिक सिलेंडर ची दुरुस्ती :-** सदर जेसीबी मशिनचे सर्व हायड्रॉलिक पाईप खोलुन बाजुला करुन सर्व सिलेंडरचे पिन काढुन सर्व सिलेंडर खाली उतरवून घेणे. सर्व सिलेंडर डिझेल ने स्वच्छ करुन पुर्णपणे डिसमेंटल करणे. खराब झालेले पिस्टन सिल, ओरिंग, बॅक अॅप रिंग, सेकंडरी रॉड सिल, प्रायमरी रॉड सिल, बिमटेल बुश, डावेल स्प्रिंग, स्क्रु सेट, पिस्टन, कश हॉनिंग प्लंजर, वॉशर, बाहेर काढुन सर्व नमुद केलेले पार्ट नविन फिटींग करुन हायड्रॉलिक सिलेंडर पुन्हा फिटींग करणे. सर्व हायड्रॉलिक सिलेंडरला हायप्रेशर होज पाईप ची फिटींग करुन एअर काढुन पुर्ण दुरुस्ती करणे.

**एक्सेलेटर ची दुरुस्ती :-** जुना एक्सेलेटर पायडल व केबल काढुन त्याजागी नविन केबल आऊटर सहित तसेच नविन पायडल असेंबली फिटींग करुन इंजिनच्या रेस ची सेटींग करुन पुर्ण दुरुस्ती करणे.

लोडर ब्रेकॅट आणि बॅकहो ब्रेकेट ची दुरुस्ती :- ब्रेकेट चे तिथ पॉईट ०४ नग तुटले असल्यामुळे व लोडर ब्रेकेट चा पत्रा फाटला असल्यामुळे ज्या ठिकाणचा पत्रा फाटला आहे त्या ठिकाणी गॅस कटरच्या साह्याने पत्रा कट करुन नंतर त्या साईज चा पत्रा वेल्डींग करणे. तसेच लोडर चे ०४ नग नविन तिथ पॉईट नट बोल्ट सहित फिटींग करुन बुशचे दोन्ही स्लिव बाहेर काढुन पिनचे साईजचे गनमेटलचे बुश फिटींग कटींग तसेच रिमिंग करणे. तसेच बॅकहो ब्रेकेट च्या फाटलेल्या पत्रा गॅस कटरच्या साह्याने कटींग करुन त्याजागी नविन पत्रा कटींग करुन वेल्डींग करणे. तसेच ०२ नग तिथ पाईट नट बोल्ट सहित फिटींग करुन नविन बुश सुद्धा फिटींग करणे.

**वायरींग ची दुरुस्ती :-** सदर जेसीबी मशिनची खराब झालेली वायरींग बाहेर काढुन कटींग करुन त्याजागी नविन वायरींग फिटींग व टेपिंग करणे. सर्व ब्रेकेट नविन फिटींग करणे. रिर्वस व फॉरवड स्विच नविन फिट करणे. किटची वायर नविन फिटींग करणे. सर्व लाईट व हॉर्न नविन फिटींग करुन चालु करणे व नविन कट आऊट फिटींग करुन दुरुस्ती करणे.

Choudhari

वाहन व्यवस्थापक,
भि. नि. शहर महानगरपालिका, भवंडी.

---

तारीख:- ३१/१०/२०१८
खालील ठिकाणी प्रसिध्द केली.